# ऑनलाइनरॅडिकलायजेशन
# आणि त्याला प्रतिबंध


- मधुबन पिंगळे, पुणे


जानेवारी २०२०


सेंटर फॉर पोलिस रिसर्च, पुणे

# आभार

'इस्लामिक स्टेट'ने काही वर्षांपासून जागतिक शांतता आणि स्थैर्यासमोर आव्हान उभे केले आहे. तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर इंटरनेट आणि सोशल मीडियाचा या दहशतवाद्यांकडून झालेला वापर, ही चिंतेची गोष्ट आहे. सोशल मीडियावरून तरुणांना जाळ्यामध्ये अडकवताना, या तरुणांभोवती 'रॅडिकलायेजशन'चा विळखा घालण्यात येत आहे. यामध्ये भारतातील तरुणही सुटलेले नाहीत. सुमारे शंभरपेक्षा जास्त तरुण इराक, सीरिया आणि अफगाणिस्तानात निघून गेले आहेत. तर, सुमारे १५० तरुणांना 'एनआयए' आणि विविध राज्यांच्या सुरक्षा यंत्रणांनी अटक केली आहे. 'इस्लामिक स्टेट'कडून विविध अॅपवर होणाऱ्या मजकुराने प्रभावित झालेल्या तरुणांची संख्याही कमी नाही. ऑनलाइन रॅडिकलायजेशनच्या या प्रक्रियेमध्ये तरुणांमध्ये कट्टरतावाद पेरतानाच, त्यांना स्थानिक पातळीवर कारवाया करण्यासाठीही उद्युक्त करण्यात येते. सध्याच्या जगामध्ये कोणतीच व्यक्ती पूर्णपणे ऑफलाइन राहू शकत नाही. या परिस्थितीमध्ये या तरुणांच्या मनातील कट्टरतावादाचा विखार कमी करत, त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी ऑनलाइन पद्धतीनेच विचार मांडण्याची गरज आहे. यामध्ये तरुणांना योग्य वेळी प्रतिबंध करतानाच, भरकटलेल्या तरुणांनाही टप्प्याटप्प्याने मुख्य प्रवाहात आणणे शक्य आहे. यासाठी इंटरनेट आणि सोशल मीडियावरच कार्यक्रम राबविणे आवश्यक ठरते.

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे अतिरिक्त महासंचालक आणि 'सेंटर फॉर पोलिस रिसर्च'चे प्रमुख अतुलचंद्र कुलकर्णी यांनी दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. त्यामुळे, ही समस्या, त्यातून निर्माण होणारा धोका आणि

त्याला रोखण्यासाठीचे उपाय यांची गरज त्यांना सातत्याने वाटत होती. त्यातूनच, त्यांनी 'सेंटर फॉर पोलिस रिसर्च'च्या माध्यमातून या संशोधनाची संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल सर्वांत आधी त्यांचे आभार मानतो. या संशोधनाचे महत्त्व सांगतानाच, त्यांनी त्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. त्यांच्या कार्यकाळातील अनुभवही त्यांनी सांगितला. यातून, या संशोधनाची सुरुवात योग्य मार्गावरून झाली आणि त्याचा फायदा झाला.

या संशोधनासाठी समन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आलेले सहायक पोलिस निरीक्षक यतिन संकपाळ यांनीही सातत्याने संशोधनासाठी मदत केली. संशोधनामध्ये प्रत्यक्ष परिस्थितीतील अडचणी, अनुभव यांची माहिती देतानाच, याविषयी सतत योग्य अधिकारी, व्यक्तींपर्यंत पोहोचता येईल, याची काळजी त्यांनी घेतली. त्यामुळे, विविध अधिकाऱ्यांना भेटणे आणि त्यांचे अनुभव ऐकणेही सोपे झाले. याशिवाय, मुस्लिम धर्माचे अभ्यासक अब्दुल कादर मुकादम यांनी दिलेली मुलाखत दहशतवाद्यांकडून वापरण्यात येणाऱ्या धर्माच्या संदर्भांना बोथट करण्यासाठी उपयुक्त ठरली. तरुणांची मानसिकता समजण्यासाठी मुंबईतील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी यांनी केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. कॅनडातील सहायक प्राध्यापक आणि रॅडिकलायजेशनचा बारकाईने अभ्यास करणारे समकालीन तज्ज्ञ अमरनाथ अमरसिंगम यांनी ईमेलच्या माध्यमातून दिलेली मुलाखत संशोधनाचे क्षितिज व्यापक करणारी ठरते. याशिवाय, मुबीन शेख आणि मन्वर अली यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध लिंक शेअर केल्या, त्याचा फायदाही या संशोधनामध्ये झाला.

सतत प्रोत्साहन देणारे आणि वेगळ्या प्रयत्नांसाठी प्रेरित करणारे 'महाराष्ट्र टाइम्स'चे मुख्य संपादक पराग करंदीकर आणि 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक श्रीधर लोणी यांचाही उल्लेख आवर्जून करावा लागेल.

संशोधनाला सुरुवात झाल्यापासून, 'सेंटर फॉर पोलिस रिसर्च'चे पोलिस अधीक्षक आनंद भोईटे, पोलिस निरीक्षक संजय तुंगार यांनीही वेळोवेळी मदत केली. या संशोधनामध्ये अनेक पोलिस अधिकारी आणि या क्षेत्रामध्ये तज्ज्ञांनी मदत केली. त्यांचे अनुभव सांगितले, त्यांच्या सहकार्याशिवाय हा प्रकल्प पूर्ण होणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांचेही आभार मानतो.

- मधुबन पिंगळे

# अनुक्रमणिका


१.'इस्लामिक स्टेट' उद्रेक आणि विस्तार ... ६

२. कट्टरतेचा विळखा अर्थात रॅडिकलायजेशन ... २८

३. तंत्रज्ञानाच्या आयुधाशी दोन हात ... ७०

४.हृदयपरिवर्तनाचे प्रयत्न ... ११०

५. भारतातील हृदयपरिवर्तनाचे प्रयत्न ...१३७

६.सर्वंकष प्रयत्नांची गरज ...१७३

**प्रकरण पहिले**

# 'इस्लामिक स्टेट'चा उद्रेक आणि विस्तार

जागतिक राजकारणामध्ये २१व्या शतकाच्या सुरुवातीला ११ सप्टेंबर २००१च्या (९/११) अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्याने झाली आणि या शतकाची वाटचाल कोणत्या दिशेने होणार, याचे संकेत मिळाले. या हल्ल्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आंतरराष्ट्रीय फौजांनी अफगाणिस्तानवर केलेली कारवाई आणि २००३मध्ये सद्दाम हुसेन यांची राजवट उलथवून टाकण्यासाठी अमेरिका व 'नाटो' देशांनी इराकमध्ये केलेले आक्रमण, यातून आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि त्यातून होणारा हिंसाचार यांची परिभाषा बदलली. या दोन्ही कारवायांनंतर निर्माण झालेली परिस्थिती आणि जागतिक राजकारणातील गुंतागुंत यांमुळे इराक आणि सीरिया यांच्या प्रदेशामध्ये या शतकातील आतापर्यंतचे सर्वांत मोठे आव्हान निर्माण झाले, हे आव्हान म्हणजे इस्लामिक स्टेट (आयएस).

इराक आणि सीरियामध्ये निर्माण झालेल्या या दहशतवादी संघटनेने जाळे जगभरात पसरले असून, युरोपसह जगभरातील विविध देशांमध्ये या संघटनेने चिथावणी दिलेल्या तरुणांनी हल्ले केले आहेत. अन्य दहशतवादी संघटनांप्रमाणे तरुणांमध्ये स्थानिक परिस्थितीतून असणाऱ्या असंतोषाचा फायदा घेण्यात 'इस्लामिक स्टेट' यशस्वी झाली आहेच, त्याचबरोबर बदलत्या तंत्रज्ञानाचा फायदा घेत, सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना फितवण्याचा, त्यांना धर्मांध करण्याचा वेग कैक पटीने वाढला आहे आणि हीच या सर्वांत मोठी चिंतेची गोष्ट आहे. त्यामुळेच, सीरियाचे अध्यक्ष बशर अल असद यांनी फ्रान्समधील 'पॅरिस मॅच' या साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीतील वाक्य खूप महत्त्वाचे आहे, 'हे दोन देशांच्या लष्करांमधील युद्ध नाही, की ज्यामध्ये एखादा देश एका प्रदेश आणि दुसरा त्याच्यासमोरील. या संघर्षामध्ये आम्ही शहर आणि गावांमध्ये लपलेल्या दहशतवाद्यांविरोधात लढत आहोत. हे युद्ध अनेक वर्षांपर्यंत सुरूच राहील आणि आतापर्यंतचे सर्वांत कठीण युद्ध असेल.'[i]या गुंतागुंतीच्या आव्हानाचा सामना करताना, या

तरुणांना सोशल मीडियातील चिथावणीपासून रोखणे, हे आपल्यासमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे.

मुळात अल-कायदा इन इराक (एक्यूआय) या अल-कायदाच्या शाखेतून निर्माण झालेल्या 'इस्लामिक स्टेट'ला 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया' (आयएसआयएस), 'इस्लामिक स्टेटस ऑफ इराक अँड लेव्हंट' (आयएसआयएल) आणि अरबी भाषेमध्ये 'दाएश' या नावांनीही ओळखले जाते. अमेरिकेच्या हल्ल्यानंतरची इराकमधील अनागोंदी, तेथे निर्माण झालेला शिया-सुन्नी संघर्ष, इराकी सैन्याच्या माघारीनंतर दहशतवाद्यांच्या हाती आलेला प्रचंड शस्त्रसाठा अशी अनेक कारणे यामागे आहेत. मात्र, इराक आणि सीरियामध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीमागे ऐतिहासिक कारणेही असल्याचे समोर आले. यातील प्रमुख कारणे म्हणजे,[ii]



**https://www.theguardian.com/us-news/2016/jan/16/virginia-isis-suspect-arrest-joseph-hassan-farrokh#img-1 (accessed on 14-02-2020)**

**१. पश्चिम आशियातील गुंतागुंत :** पश्चिम आशियातील देशांमध्ये असणाऱ्या शिया-सुन्नी लोकसंख्येची विभागणी, खनिज तेलाचे साठे आणि प्रत्येक देशाची प्रादेशिक सत्ता होण्याची महत्त्वाकांक्षा, यांमुळे पश्चिम आशियातील परिस्थितीमध्ये गुंतागुंत आहे.

**२.शिया-सुन्नी शीतयुद्ध :** पश्चिम आशियातील ८५ टक्के लोकसंख्या सुन्नी पंथाची असून, उर्वरित १२ ते १५ टक्के शिया लोकसंख्या इराक-इराण या प्रदेशामध्ये एकवटला आहे. या दोन्ही पंथांमधील संघर्ष ऐतिहासिक आहे. त्यामुळे, आधुनिक काळामध्येही त्यांच्यातील शीतयुद्ध दिसून येते. विशेषतः इराक शियाबहुल असताना, सद्दाम हुसेन

यांच्यापर्यंत तेथील सत्ता सुन्नींच्या हाती एकवटली होती, तर सुन्नीबहुल सीरियामध्ये १९६९पासून असद कुटुंबाच्या रुपाने अल्वाइट शिया सत्तेवर आहेत.

**३.देशांची कृत्रिम रचना :** पहिल्या महायुद्धाच्या काळामध्ये ब्रिटनकडून पश्चिम आशियातील विविध गटांना स्वतंत्र देशाची आश्वासने दिली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर या आश्वासनांची पूर्तता करताना, अनेक आश्वासनांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. तर, अनेक ठिकाणी कृत्रिम सीमा आखण्यात आल्या. त्यामुळे, कोणताही एक देश नसणारा कुर्द हा जगातील सर्वांत मोठा वंश अस्तित्वात आला. अशा अनेक बाबींमुळेअनेक गटांमध्ये अपमानाची आणि विश्वासघात झाल्याची भावना निर्माण झाली.

**४.इस्रायलची निर्मिती :** पश्चिम आशियातील नागरिकांमध्ये पाश्चिमात्य देशांविषयी आणि आपल्याच देशांतील सत्ताधीशांविरोधात भावना निर्माण होण्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे १९४८मध्ये निर्माण झालेली इस्रायलची निर्मिती. जेरुसलेम ही ज्यूंची जन्मभूमी असून, हजारो वर्षांपूर्वी त्यांना येथून विस्थापित व्हावे लागले होते. युरोपसह जगभरात विखुरलेल्या या ज्यूंसाठी स्वतंत्र देश स्थापन करून देण्याची घोषणा ब्रिटनने १९१६मध्ये केली. या आश्वासनांची पूर्तता करताना, स्थानिक पॅलेस्टिनींची मागणी धुडकावून लावण्यात आली. त्यानंतर झालेल्या पाच युद्धांमध्येही अरब देशांना इस्रायलच्या फौजांकडून पराभव स्वीकारावा लागला. ही सल अजूनही सामान्य अरब नागरिकांच्या मनामध्ये कायम आहे.

**५.अमेरिकेचा हस्तक्षेप :** ब्रिटनचा पश्चिम आशियातील प्रभाव कमी होत असताना, अमेरिकेचा वाढलेला प्रभाव आणि हस्तक्षेपही या प्रदेशातील असंतोष वाढविण्यासाठी कारणीभूत ठरला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये अनेक वेळा नकाराधिकाराचा वापर करून, अमेरिकेने इस्रायलची पाठराखण केली आहे. याशिवाय, अमेरिकेने तब्बल १७ वेळा या प्रदेशात हल्ले केले आहेत.

अमेरिकने २००३मध्ये इराकवर आक्रमण केल्यानंतर, तेथील सद्दाम हुसेन यांची राजवट उलथवून टाकण्यात आली. या हल्ल्यानंतर निर्माण झालेली निर्नायकीची

परिस्थिती अल-कायदा आणि अन्य दहशतवादी संघटनांसाठी पोषक होती. यातूनच, तेथे 'अल-कायदा'चा प्रवेश झाला आणि त्यातूनच पुढे 'इस्लामिक स्टेट' आकाराला आली. 'अल-कायदा इन इराक'ची २००३मध्ये स्थापना झाली आणि 'इस्लामिक स्टेट'ने २०१४मध्ये खिलाफतीची घोषणा केली, या दहा-अकरा वर्षांमध्ये 'इस्लामिक स्टेट'च्या अखत्यारीमध्ये मोठा प्रदेश आला होता. एका आकडेवारीनुसार,[iii] '२०१४मध्ये 'इस्लामिक स्टेट'कडे ४० हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचा परिसर होता. या प्रदेशात जवळपास ८० लाख नागरिक राहात होते. तर, संघटनेमध्ये ४० हजारांपेक्षा जास्त सशस्त्र दहशतवादी होते. इराकच्या लष्कराने या भागातून पळ काढताना सोडलेला शस्त्रास्त्रांचा साठा या दहसतवाद्यांच्या हाती लागला होता. यामध्ये रॉकेट लाँचर, विमानभेदी तोफा, रॉकेट, ट्रकवरील मशिनगन यांचा समावेश होता. याशिवाय, विविध माध्यमातून त्यांच्याकडे जवळपास दोन अब्ज डॉलरची संपत्ती निर्माण झाली होती. त्यामुळे, ही जगातील सर्वांत श्रीमंत दहशतवादी संघटना ठरली आहे.' या दहशतवादी संघटनेची सुरुवातीपासूनची वाटचाल आणि कारवाया यांचाही विस्तृतपणे विचार करण्याची गरज आहे.[iv]

**'इस्लामिक स्टेट'ची वाटचाल**

**२००४ :** अबू मुसाब अल झरकावीने 'अल-कायदा इन इराक'ची (एक्यूआय) स्थापना केली.

**७ जून २००६ :** अमेरिकेच्या हल्ल्यात झरकावी ठार. संघटनेची सुत्रे अबू अय्यब अल मस्रीच्या हातामध्ये

**१५ ऑक्टोबर २००६ :** अल-मस्रीने 'इस्लामिक स्टेट इन इराक'ची (आयएसआय) स्थापना केली.

**एप्रिल २०१० :** अमेरिका व इराकच्या संयुक्त कारवाईत अल-मस्री मारला गेला आणि 'इस्लामिक स्टेट इन इराक'ची सुत्रे अबू बक्र अल-बगदादीच्या हातामध्ये आली.

**जुलै २०११ :** सीरियातील यादवीमध्ये 'इस्लामिक स्टेट इन इराक'च्या दहशतवाद्यांनी सहभाग घेतला. सीरियातील संघटनेचे नाव 'अल-नुस्रा फ्रंट' असे ठेवण्यात आले.

**एप्रिल २०१३ :** बगदादी सीरियामध्ये पोहोचला आणि आता संघटनेचे नाव 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया' (आयएसआयएस) झाल्याची घोषणा केली. मात्र, अल-कायदाशी संलग्न 'नुस्रा फ्रंट'ने त्यांच्याशी संबंध तोडले.

**जानेवारी २०१४ :**'आयएसआयएस'ने राक्का शहर ताब्यात घेत, आपल्या अमिरातीची राजधानी असल्याची घोषणा केली.



**https://www.amarujala.com/world/rest-of-world/al-qaeda-chief-ayman-al-zawahiri-calls-islamic-state-and-its-leader-abu-bakr-al-baghdadi-liars (accessed on 14-02-2020)**

**१० जून २०१४ :**'आयएसआयएस'ने इराकमधील मोसूल शहर ताब्यात घेतले. त्यांचा आतापर्यंतचा हा सर्वांत मोठा विजय होता. दुसऱ्या दिवशी तिक्रीत हे शहरही त्यांच्या हातामध्ये आले.

**२९ जून २०१४ :** मोसूल येथून अबू बक्र अल-बगदादीने खिलाफतीची स्थापना झाल्याची घोषणा केली आणि आपल्या अमिरातीचे नाव 'इस्लामिक स्टेट' (आयएस)असल्याची घोषणा केली.

**७ जानेवारी २०१५ :** फ्रान्समधील 'शार्ली हेब्दो' या नियतकालिकाच्या कार्यालयावर दोन हल्लेखोरांनी हल्ला केला. यात ११ जणांचा मृत्यू झाला. या हल्लेखोरांनी 'इस्लामिक स्टेट'चे सदस्य असल्याची घोषणा केली.

**१० जानेवारी २०१५ :** अफगाणिस्तानमध्ये 'इस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया - खोरासन' या गटाची स्थापना केल्याचे जाहीर करण्यात आले.

**३१ ऑक्टोबर २०१५ :** इजिप्तच्या सिनाई प्रांतामध्ये 'इस्लामिक स्टेट'च्या संलग्न दहशतवाद्यांनी रशियाचे प्रवासी विमान पाडले, २२४ जणांचा मृत्यू.

**१३ नोव्हेंबर २०१५ :** पॅरिसमध्ये दहशतवाद्यांनी नियोजनपूर्वक हल्ला घडवून आणला. एकाच वेळी अनेक ठिकाणी गोळीबार केला. या हल्ल्यात १३० जणांचा मृत्यू झाला.

**१२ जून २०१६ :** अमेरिकेच्या फ्लोरिडातील नाइट क्लबमध्ये गोळीबार. हल्लेखोराने 'इस्लामिक स्टेट'शी संलग्न असल्याचे जाहीर केले.

**१ जुलै २०१६ :** बांगलादेशची राजधानी ढाका येथे दहशतवाद्यांनी एका रेस्टॉरंटवर हल्ला केला. या हल्ल्यात २२ जणांचा मृत्यू झाला. त्यावेळी बांगलादेशातील 'जमातुल मुजाहिदीन बांगलादेश'ने 'इस्लामिक स्टेट'चे नेतृत्व मान्य करत असल्याचे जाहीर केले.

**१४ जुलै २०१६ :** फ्रान्सच्या नीस शहरामध्ये एका ३१ वर्षांच्या ट्युनिशियन तरुणाने गर्दीमध्ये ट्रक घुसवला, त्यात ८४ जणांचा मृत्यू. 'इस्लामिक स्टेट' या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली.

**९ जुलै २०१७ :** इराकच्या फौजांनी मोसूल शहर 'इस्लामिक स्टेट'च्या ताब्यातून परत मिळवले.

**१७ ऑक्टोबर २०१७ :**'इस्लामिक स्टेट'ची राजधानी असणाऱ्या राक्का शहरावर अमेरिकेच्या संघटनांचा ताबा.

**२३ ऑक्टोबर २०१७ :** फिलिपिन्सच्या मारावी शहरावर पुन्हा लष्कराचा ताबा. या शहरावर पाच महिने 'इस्लामिक स्टेट'शी संलग्न अबू सय्यफ ग्रुपचा ताबा होता.

**२३ मार्च २०१९ :**'सीरियन डेमोक्रॅटिक फोर्सेस'ने सीरियातील बघौज हे गावही ताब्यात घेतले आणि 'इस्लामिक स्टेट'च्या ताब्यातील शेवटचे गावही ताब्यात आले.

**२१ एप्रिल २०१९ :** श्रीलंकेतील तीन चर्च आणि तीन हॉटेलनांना लक्ष्य करत, बॉम्बस्फोट करण्यात आले. यामध्ये २५० जणांचा मृत्यू झाला. 'इस्लामिक स्टेट'ने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणारा अबू बक्र अल-बगदादीचा व्हिडिओही नंतर प्रसिद्ध केला होता.

**३० एप्रिल २०१९ :** अबु मुहम्मद अल-बंगाली हा बंगालचा अमीर असल्याचे 'इस्लामिक स्टेट'ने जाहीर केले.

**१० मे २०१९ :**काश्मीर खोऱ्यात झालेल्या चकमकीनंतर, 'इस्लामिक स्टेट'ची विलायत काश्मीरमध्ये स्थापन झाल्याचा दावा 'इस्लामिक स्टेट'च्या 'अमाक न्यूज एजन्सी'ने केला.

**२६ ऑक्टोबर २०१९ :** अमेरिकेच्या कमांडो पथकाने सीरियातील इदलीब शहरामध्ये केलेल्या कारवाईत बगदादी ठार झाला. 'इस्लामिक स्टेट'नेही बगदादी ठार झाल्याचे मान्य करताना, इब्राहीम अल-हाशेमी अल-कुरेशी या नव्या म्होरक्याच्या नावाची घोषणा केली.

या नोंदीमध्ये 'इस्लामिक स्टेट'च्या मोजक्याच कारवायांचा समावेश आहे. या कालावधीमध्ये या दहशतवाद्यांनी युरोपमध्ये अनेक हल्ले घडवून आणले. इराक आणि सीरियामध्ये अगणित कारवाया झाल्या आणि हजारो जणांचा मृत्यू झाला. मेरिलँड विद्यापीठाने २०१६मध्ये केलेल्या अभ्यासानुसार, 'इस्लामिक स्टेट'च्या हातातील प्रदेश कमी होत असला, तरीही या संघटनेने वर्षभरात १४००पेक्षा जास्त हल्ले केले असून, त्यात सात हजारांपेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे.[v] या काळात बगदादीच्या मृत्यूच्या बातम्याही अनेक वेळा आल्या, तर या बातम्या खोट्या ठरविण्यासाठी 'इस्लामिक स्टेट'ने बगदादीचे व्हिडिओही प्रसिद्ध केले.

इराक आणि सीरियातील 'इस्लामिक स्टेट'चे भौगोलिक अस्तित्व संपले असून, या दहशतवादी संघटनेकडे कोणताही भूभाग उरलेला नाही. त्यांचा म्होरक्या अल बगदादीचाही मृत्यू झाला आहे. तरीही, 'इस्लामिक स्टेट'चा धोका पूर्णपणे संपला असे म्हणता येणार नाही. किंबहुना, 'इस्लामिक स्टेट' आता नव्या अवतारात आली असून, त्यांना कोणत्याही प्रदेशावर नियंत्रण नको आहे. त्यांची कार्यपद्धती काही प्रमाणात अल-कायदाप्रमाणे होत असल्याकडे कुर्दीश गुप्तचर यंत्रणेतील एका अधिकाऱ्याने लक्ष वेधले.[vi]या दहशतवादी संघटनेकडून पुन्हा इराक आणि सीरियामध्ये कारवाया करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत

आहेत. या संघटनेतील दहशतवादी पूर्वीपेक्षा जास्त प्रगत आणि तंत्रकुशल झाले आहेत, असा अंदाजही व्यक्त करण्यात येत आहे. हे दहशतवादी इराकमधील पर्वतरांगांमध्ये लपले आहेत आहेत आणि त्यांना शोधून काढणे, सुरक्षा दलांसमोरील सर्वांत मोठी डोकेदुखी असेल, अशी व्यक्त करण्यात येते.

सीरियातील अस्तित्व संपल्यानंतर, अमेरिकेचा पाठिंबा असणाऱ्या सशस्त्र संघटनांनी ‘इस्लामिक स्टेट’चा संपूर्ण प्रदेश ताब्यात घेतला. त्या संघर्षामध्ये ठार मारलेल्या किंवा शरण आलेल्या दहशतवाद्यांची संख्या पूर्वीच्या अंदाजापेक्षा कमी होती. याचाच अर्थ, ‘इस्लामिक स्टेट’चे हजारो दहशतवाद्यांनी अखेरच्या कारवाईपूर्वीच तेथून पळ काढला होता. अत्यंत कडवट आणि शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण मिळालेले हे दहशतवादी आता अन्यत्र राहात आहेत, ही सर्वांत धोक्याची गोष्ट आहे, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यामुळे, ‘इस्लामिक स्टेट’विरोधातील संघर्ष आता नव्या टप्प्यामध्ये पोहोचला आहे, याकडे तज्ज्ञ लक्ष वेधतात. रोहन गुणरत्ने यांनी याविषयी समर्पक विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, ‘अमेरिकेवरील ११ सप्टेंबर २००१च्या हल्ल्यानंतर दहशतवादाचे तीन टप्पे असून, दहशतवादी संघटना आता तिसऱ्या टप्प्यामध्ये प्रवेश करत आहेत. यातील पहिला टप्पा किंवा जिहाद १.० म्हणजे अल-कायदाच्या कारवाया. तर, अबू बक्र अल बगदादीने २०१४मध्ये खिलाफतीची घोषणा केली, ती म्हणजे जिहाद २.०. यानंतर २०१८नंतर ‘इस्लामिक स्टेट’चे रुपांतर खिलाफतीतून आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेमध्ये झाले आणि जिहाद ३.०ची सुरुवात झाली. ‘इस्लामिक स्टेट’ अन्य देशांमध्ये असलेल्या ‘विलायतीं’च्या रुपामध्ये सक्रिय आहे. यासाठी अनेक देशांमधील गट, संघटना त्यांच्याशी संलग्न आहेत.’[vii]‘इस्लामिक स्टेट’कडून ‘विलायत’ या संकल्पनेचा अनेक वेळा वापर करण्यात आला आहे. जगातील अनेक भागांमध्ये स्थानिक सरकारी यंत्रणा कमकुवत असल्यामुळे, दहशतवाद्यांनी त्या भागामध्ये प्रभाव निर्माण करत कारवाया सुरू केल्या आहेत. या ठिकाणच्या दहशतवाद्यांना एकत्र बांधून ठेवत, त्याच भागावर लक्ष केंद्रीत करण्याची सूचना करण्यासाठी ‘इस्लामिक स्टेट’ने त्या-त्या भागामध्ये ‘विलायत’ (प्रांत) स्थापन झाल्याची घोषणा केली होती. यामध्ये अफगाणिस्तानातील कथित खोरासन

विलायतीपासून काश्मीर, बांगलादेश, नायजेरिया, लीबिया, अल्जेरिया, इंडोनेशिया, फिलिपिन्स अशा अनेक विलायतींचा यामध्ये समावेश आहे.[viii]

सीरियातील अखेरचे शहरही गमावल्यानंतर 'इस्लामिक स्टेट'चे रुपांतर एका बहुराष्ट्रीय दहशतवादी संघटनेमध्ये झाले आहे. ही संघटना वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या स्तरांवर सक्रिय आहे. इस्लामिक स्टेटच्या प्रशिक्षणाचा सर्वांत धोकादायक भाग म्हणजे, पाच वर्षांपर्यंतच्या मुलांनाही या पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येत होते. त्यांना Cubs of the Caliphate असे मानले जात होते.[ix]या मुलांना मोहात पाडून, त्यांची निवड करणे आणि त्यांना वश करत दहशतवादी कारवायांसाठी तयार करणे, हा या प्रशिक्षणाचा भाग होता. युरोपमध्ये जाणाऱ्या स्थलांतरितांमध्ये अशा मुलांचा, विशेषतः सीरियातील मुलांचा समावेश होता, असे जर्मनीच्या गुप्तचर संस्थेने सांगितले होते. त्यातून युरोपमध्ये हल्ले करण्याचा डाव होता. विशेष म्हणजे, या छोट्या मुलांना युरोपात पाठविले आणि त्यांचे वय वाढले, तर भविष्यामध्येचेहरेपट्टीमध्ये होणाऱ्या बदलांमुळेया मुलांची ओळख पटवणे शक्य होणार नाही, ही गोष्टही जर्मन गुप्तचरांनी अधोरेखित केली आहे.

इस्लामिक स्टेट ही अनेक अर्थांनी दहशतवादी कारवायांमध्ये नवा ट्रेंड निर्माण करणारी संघटना ठरली आहे. यामध्ये निधी उभा करणे आणि तो खर्च करणे, हल्ले करण्यासाठी बहुस्तरीय पद्धतींचा वापर करणे यांचा समावेश आहे. सोशल मीडिया आणि एनक्रिप्टेड संदेशांमधून परदेशांमध्ये हल्ले घडवून आणण्यामध्ये ही संघटना यशस्वी झाली आहे. पॅरिस आणि ब्रुसेल्समध्ये अनुक्रमे नोव्हेंबर २०१५ आणि मार्च २०१६मध्ये झालेले हल्ले या कार्यपद्धतीची साक्ष देतात. या हल्ल्यांमुळे दहशतवादी कारवायांमध्ये एखाद्या वाहनांमध्ये स्फोटके भरून घातपात करण्यापासून हल्ल्यांच्या नव्या पद्धतींना सुरुवात झाली. यामध्ये एखाद्या वेगळ्याच हत्यारांनी जोरदार हल्ला करून पळ काढण्यासारखे नवे प्रकार पाहायला मिळाले.[x]

'अफ्टर द खिलाफत' या कॉलिन क्लार्क यांच्या पुस्तकामध्ये वेगवेगळ्या देशांमध्ये पसरलेल्या 'इस्लामिक स्टेट'शी संबंधित संलग्न संघटनांचा आवाका स्पष्ट केला आहे.[xi]

सीरिया आणि इराकमध्ये खिलाफत स्थापन केल्यानंतर, अन्य देशांतील दहशतवादी संघटना 'इस्लामिक स्टेट'च्या संपर्कात आल्या. इराक-सीरियामधील अस्तित्व संपुष्टात आल्यानंतरही 'इस्लामिक स्टेट'चे अन्य देशांतील गट सक्रिय असल्याचे दिसून आले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने २०१८मध्ये इस्लामिक स्टेटच्या विविध देशांमध्ये सक्रिय असणाऱ्या शाखांची नावे व माहिती जाहीर केली. यामध्ये अफगाणिस्तान, इंडोनेशिया, लीबिया, इजिप्तचा सिनाई द्विपकल्प, अल्जेरिया, ट्युनिशिया, फिलिपिन्स, बांगलादेश, उत्तर कॉकेशस, सहारा व पश्चिम आफ्रिकेच्या भागामध्ये हे गट सक्रिय आहेत. यातील काही प्रमुख गट व त्यांची ताकद पुढीलप्रमाणे आहे.

| देश | दहशतवाद्यांची अंदाजे संख्या | दहशतवाद्यांचे लक्ष्य | भौगोलिक नियंत्रण | क्षमता |
|---|---|---|---|---|
| अफगाणिस्तान | ५००-१००० | नागरिक, बंडखोर गट | विखंडीत प्रदेश | प्रादेशिक |
| लीबिया | ५००-८०० | सुरक्षा दले | छोटे-छोटे प्रदेश | बहुराष्ट्रीय |
| सिनाई द्विपकल्प | ७५० | सुरक्षा दले | छोटा प्रदेश | स्थानिक |
| पश्चिम आफ्रिका | ३५०० | सुरक्षा दले | मोठा भौगोलिक पट्टा | स्थानिक |
| येमेन | १००-२५० | सुरक्षा दले | छोटा प्रदेश | स्थानिक |

इस्लामिक स्टेट इराक आणि सीरियामध्ये नेस्तनाबूत झाले असले, तरीही त्यांच्या कारवाया वाढत राहू शकतात. पुढील काळामध्ये या कारवायांचे तीन ट्रेंड दिसू शकतात.[xii]

१. 'इस्लामिक स्टेट'चे रुपांतर खिलाफत उभी करणारी संघटना या ऐवजी जागतिक दहशतवादी संघटना असा बदल झाला आहे. त्यांनी ताब्यातील प्रदेश गमावला असला, तरीही त्यांनी जागतिक स्तरावर प्रसार करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये सायबर आणि प्रादेशिक स्वरूपामध्ये प्रसार करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यातूनच,

क्वेट्टामध्ये डिसेंबर २०१७मध्ये एका चर्चवर हल्ला झाला. तर, न्यूयॉर्कमध्येही एका ट्रकने हल्ला झाला होता.

२.‘इस्लामिक स्टेट’ने त्यांची कार्यपद्धती विकेंद्रीत केली असून, विलायतींच्या रुपामध्ये त्यांच्या कारवाया सुरू झाल्या आहेत. यामध्ये लीबिया, इजिप्त, येमेन, अल्जेरिया, अफगाणिस्तान-पाकिस्तान, रशियन कॉकेशस, फिलिपिन्स व पूर्व आशिया अशा भागांमध्ये या विलायती सक्रिय आहेत. सीरिया व अफगाणिस्तान-पाकिस्तानमध्ये ‘इस्लामिक स्टेट’ला अल-कायदाकडून कडवा विरोध होत आहे.

३.सीरियामध्ये इस्लामिक स्टेटची पिछेहाट होत असताना, सध्याच्या अस्थिरतेच्या परिस्थितीमध्ये अल-कायदाशी संलग्न ‘जभात फतेह अल-शाम’च्या नेतृत्वाखालील ‘हयात ताहरीर अल-शाम’ ही संघटना ती पोकळी व्यापत आहे.

याशिवाय, कॉलिन क्लार्क आणि अमरसिंगम अमरनाथ यांनीही या प्रसाराच्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे.[xiii] या दोन्ही तज्ज्ञांनी त्यांच्या लेखामध्ये ब्रुस हॉफमन यांच्या विधानाचा दाखला दिला आहे. दहशतवादविषयक तज्ज्ञ ब्रुस हॉफमन यांच्या अंदाजानुसार, ‘इस्लामिक स्टेट’ची अशीच घसरण सुरू झाली, तर ते पुन्हा अल-कायदाशी संपर्क साधत त्यांच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतील. तोच त्यांच्यासमोरील एकमेव पर्याय असेल. दोन्ही संघटनांमध्ये असणारे वैचारिक मतभेद खूपच क्षुल्लक असून, ते काही क्षणात दूर होऊ शकतात आणि काळानुसार त्यांचे संदर्भही बदलू शकतात. २०१७च्या या लेखातील अंदाजानुसार, ‘इस्लामिक स्टेट’च्या दहशतवाद्यांचे तीन गट असू शकतात. यातील पहिला गट आपली निष्ठा बदलून सीरियातीलच अन्य गटांबरोबर सक्रिय होऊ शकेल. तर, दुसरा गट येमेन, लीबिया, पश्चिम आफ्रिका, अफगाणिस्तान या देशांमध्ये आसरा घेऊ शकतात. या ठिकाणी नवी आघाडी सुरू करतानाच, कथित खिलाफतीचे संरक्षण, टिकविणे आणि विस्तार करणे, या लक्ष्यासाठी तो सक्रिय राहू शकेल. तर, तिसरा गट हा मायदेशी परतणाऱ्या तरुणांचा असेल. हा तिसरा गट सर्वाधिक चिंता वाढविणारा असेल. हे तरुण सीरियातील आदर्श व्यवस्थेच्या शोधामध्ये गेले होते किंवा त्यांना तेथे साहस करायचे होते

किंवा आपल्या धार्मिक अस्मितेला व्यक्त करण्याची संधी मिळवायची होती. आता आपल्या देशामध्ये परत आल्यानंतर ते अन्य तरुणांना रॅडिकलाइज करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. हे तरुण परत येण्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये विवाह झाल्यामुळे, संघर्षामुळे आलेला थकवा किंवा कुटुंबाची आठवण अशी कारणे आहेत. मात्र, 'अन्य कोणत्या देशात असा संघर्ष झाला, तर मी पुन्हा जाऊ शकतो,' अशी एका परत आलेल्या तरुणाची प्रतिक्रिया पुरेशी बोलकी आहे.

'**इस्लामिक स्टेट**' **का धोकादायक**?

'इस्लामिक स्टेट'चा उदय आणि त्यानंतर वेगाने झालेला विस्तार यांमागे तीन महत्त्वाची कारणे आहेत आणि ही कारणे आजही त्याचप्रमाणात धोकादायक असल्याचे मानले जाते.

१.'इस्लामिक स्टेट' या नावाने दाखवलेली खिलाफत.

२.'इस्लामिक स्टेट'च्या हातामध्ये आलेला पैसा

३.माहिती युद्ध आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जगभरातील तरुणांना दिलेली चिथावणी.

इराक आणि सीरियातील भौगोलिक अस्तित्व संपुष्टात आले असले, तरीही वेगवेगळ्या पातळ्यांवर वरील तिन्ही गोष्टींचे अस्तित्व टिकून आहे. त्यामुळे, आजही जगभरातील तरुणांना फितवण्यासाठी 'इस्लामिक स्टेट'कडून या तीन कारणांचा वापर केला जाऊ शकतो.

यातील पहिली गोष्ट म्हणजे 'इस्लामिक स्टेट'च्या रुपाने त्यांनी इराक आणि सीरियामध्ये 'खिलाफत' असल्याचे भासवणारे एक काल्पनिक राज्य स्थापन केले. या राज्यामध्ये सर्वकाही आलबेल आहे, असा या दहशतवाद्यांचा दावा होता आणि त्यातूनच

ते तरुणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत होते. या परिस्थितीविषयी एरॉन झेलिन म्हणतात, की 'इस्लामिक स्टेटचा उद्रेक झाला, त्यांनी प्रोटो-स्टेट स्थापन केले आणि त्याचे अस्तित्व संपले. त्यामुळे काही जणांच्या नजेरतून इस्लामिक स्टेट संपली आहे. मात्र, ती पूर्ण नष्ट झालेली नाही आणि त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आहे. यापुढे इस्लामिक स्टेट किंवा खिलाफत अस्तित्वात होती, हे सांगण्यासाठी दर वेळी रशिदून खिलाफतीचाच (रशिदून हा अरबी शब्द असून, त्याचा अर्थ योग्य पद्धतीने मार्गदर्शन मिळालेले किंवा अचूक असा होतो. प्रेषित महंमदांच्या निधनानंतर, ६३२ ते ६६१ या काळामध्ये सत्तेवर असणाऱ्या पहिल्या चार खलिफांच्या कार्यकाळाचा उल्लेख रशिदून खिलाफत असा करण्यात येतो. हा २९ वर्षांचा कालखंड हा प्रेषितांच्या नेतृत्वाशिवाय इस्लामिक राजवटीच्या वाटचालीचा पहिला अनुभव होता.[xiv]) दाखला द्यावा लागणार नाही. त्यापेक्षा इस्लामिक स्टेटच्या काळामध्ये खिलाफत कशी होती, याचे अनुभव आता या विचारांकडे कललेल्यांसाठी महत्त्वाचे ठरतात. यामध्ये इस्लामिक स्टेटमध्ये राहून आलेल्यांच्या आठवणी, अनुभव या गोष्टीही महत्त्वाच्या ठरतात. शत्रूंनी हल्ला केला नसता, तर खिलाफतीचे स्वप्न पूर्ण झाले असते, असे अनेक जण मानतात.'[xv]तर, 'इंटरनॅशनल सेंटर फॉर द स्टडी ऑफ द रॅडिकलायजेशन'चे (आयसीएसआर) संचालक प्रा. पीटर न्यूमन यांनीही अन्य दहशतवादी संघटना आणि 'इस्लामिक स्टेट' यांच्यातील भेद सांगताना या कथित खिलाफतीचा उल्लेख केला आहे.[xvi] खिलाफत या संकल्पनेला इस्लाममध्ये खूप महत्त्व आहे, याकडे मुस्लिम धर्माचे अभ्यासक अब्दुल कादर मुकादम यांनी सांगितले. ही संकल्पना सांगताना मुकादम म्हणतात, 'प्रेषित महंमद यांचे इसवी सन ६३२मध्ये निधन झाले. तोपर्यंत तेथे एक व्यवस्था निर्माण झाली होती आणि ती कायम ठेवणे आवश्यक होते. प्रेषितांच्या निधनानंतर ही व्यवस्था चालविण्यासाठी एका नेत्याची आवश्यकता होती. त्यासाठी तत्कालीन प्रमुख व्यक्तींनी या नेत्याच्या निवडीसाठी काही निकष निश्चित केले. नेतृत्व करणारी व्यक्ती प्रेषितांच्या कुरेश टोळीतीलच हवी, त्यावेळी उपलब्ध असलेले सर्व ज्ञान त्याने मिळवलेले हवे आणि त्याच्याकडे या संपूर्ण

व्यवस्थेचे नेतृत्व करण्याचे गुण हवेत. या खलिफांच्या काळामध्ये इस्लामिक राजवटीचा विस्तार झाला, त्यामुळे, या खिलाफत राजवटीला खूप महत्त्व आहे.’[xvii]

‘इस्लामिक स्टेट’कडून तरुणांना चिथावणी देतानाच, ‘इस्लामिक स्टेट’मध्ये येण्यासाठी ‘हिजरा’ (हिजराह)करा असे सांगण्यात येत होते, तेथे या कथित राज्याचा विचार येतो, असे प्रा. न्यूमन सांगतात. अब्दुल कादर मुकादम यांनीही प्रेषितांच्या काळातील हिजरा म्हणजे स्थलांतराला खूप महत्त्व असल्याचे सांगितले. प्रेषितांनी इस्लामची स्थापना केल्यानंतर त्यांना मक्केतून मोठा विरोध होता. त्यावेळी पत्नी खादिजा आणि कुरेश टोळीचे नेतृत्व करणारे प्रेषितांचे काका अबू तालीब या दोघांचा आधार होता. खादिजा यांचे ६१९मध्ये निधन झाले, पाठोबपाठ अबू तालीब यांचेही निधन झाले. काही दिवसांच्या अंतराने हे दोन्ही आधार निखळले. त्यानंतर काही दिवसांमध्येच म्हणजे ६२०मध्ये मदिना येथील एका गटाने इस्लामचा स्वीकार केला आणि त्यांना मदिनेस येण्याची विनंती केली. त्यावेळी ते गेले नाहीत. मात्र, ६२२मध्ये त्यांनी मदिन्याला स्थलांतर केले आणि हे स्थलांतर हिजरा म्हणून ओळखले जाते.[xviii] त्यानंतर इस्लामचा वेगाने विस्तार झाला आणि भरभराट झाली. त्यामुळे, या घटनेला अतिशय महत्त्व आहे. परदेशातील तरुणांना आकर्षित करण्यासाठी ‘इस्लामिक स्टेट’कडून हिजरा या शब्दाचा वापर करण्यात येतो. याशिवाय, अल-कायदाशी संलग्न जभात अल नुस्रा व अन्य दहशतवादी संघटनांकडून तरुणांना संघटनेत घेताना त्यांची चौकशी करण्यात येत असते आणि त्यांच्याकडे कोणते कौशल्य आहे का, हे पाहिले जाते. मात्र, ‘इस्लामिक स्टेट’कडून या गोष्टींचा फारसा विचार करण्यात येत नव्हता, याकडेही न्यूमन लक्ष वेधतात.

‘इस्लामिक स्टेट’च्या हातामध्ये असणारी आर्थिक ताकद ही गोष्टही चिंतेचे प्रमुख कारण आहे. सीरियापाठोपाठ इराकमधील प्रदेश हाती पडत असताना, ‘इस्लामिक स्टेट’च्या हातामध्ये मोसूलसारखा खनिज तेलाचा मोठा स्रोत हाती आला. याशिवाय, तेथील बँका लुटून आणि अपहरण, खंडण्या यांसारख्या कारवायांमधून या दहशतवाद्यांच्या हातामध्ये कोट्यवधी डॉलरचा निधी मिळाला आहे. यातून, ही दहशतवादी संघटना आजही कारवाया करत असून, जगातील सर्वाधिक आर्थिक ताकद असणारी दहशतवादी संघटना म्हणून

आपण ‘इस्लामिक स्टेट’चे नाव घेऊ शकतो. यातील आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ‘इस्लामिक स्टेट’कडे २०१५मध्ये सहा अब्ज डॉलर एवढी संपत्ती होती. त्यांनी भौगोलिक प्रभाव गमावला असला, तरीही त्यांची आर्थिक बाजू आजही मजबूत असल्याचे मानले जाते. त्यांनी ४० कोटी डॉलर इराक-सीरियातून बाहेर नेले असून, हॉटेल, हॉस्पिटल, शेती, वाहनांची डिलरशीप यांसारख्या व्यवसायांमध्ये गुंतवली आहे, असे सांगण्यात येते.[xix]

‘इस्लामिक स्टेट’क़डून असणारा सर्वात मोठा धोका म्हणजे, त्यांच्याकडून सोशल मीडियावर सुरू करण्यात आलेले माहितीयुद्ध. अल-बगदादीने अगदी सुरुवातीलाच युरोपातील तरुणांना इराक-सीरियामध्ये येण्याचे आवाहन करत असताना, डॉक्टर, इंजिनीअर यांच्याबरोबरच विविध क्षेत्रातील जाणकार तरुणांनी यावे, असे विशेष आवाहन केले होते. हे आवाहन करत असताना जाणीवपूर्वक सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या व्यासपीठांचा वापर करण्यात आला होता. हा वापर अतिशय कौशल्यपूर्ण आणि परिणामकारकपणे केल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. ‘इस्लामिक स्टेट’च्या ‘अल-हयात मीडिया’ने डिसेंबर २०१७मध्ये एक व्हिडिओ जारी केला. त्यामध्ये आपल्या समर्थकांना संयमी राहण्याचा सल्ला दिला होता. तुमचा त्याग, बलिदान वाया जाणार नाही, आपल्याला मोठा विजय मिळणार आहे, असे सांगताना समर्थकांचे नीतीधैर्य कायम ठेवण्याचा हा प्रयत्न होता.[xx]गेल्या सात-आठ वर्षांच्या प्रत्येक कालखंडामध्ये आपल्या समर्थक आणि सहानुभूतीदारांपर्यंत योग्य तो संदेश पोहोचत राहील, याची खात्री ‘इस्लामिक स्टेट’ने बाळगली होती. यासाठी त्यांनी फोटो, व्हिडिओ, ऑडिओ यांचा अतिशय कौशल्यपूर्ण वापर केला आहे. सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होईल आणि अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहोचता येईल, याची खबरदारी या दहशतवादी संघटनेने घेतल्याचे दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या हातातील या नव्या शस्त्राला रोखण्याचे प्रमुख आव्हान आपल्या सर्वांसमोर आहे.

‘इस्लामिक स्टेट’ने काही कारणांसाठी माहिती युद्धावर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते. त्यांच्या या नव्या साधनाचा त्यांना फायदा झाल्याचेही दिसून येते.[xxi]

- सत्ताधीश असल्यामुळे त्यांच्याकडून असणारी माहिती खूपच प्रतिष्ठेची आहेअसे , मानले गेले.
- खिलाफतीच्या स्वरूपामध्ये असणारे कथन परिणामकारक करताना, यातून समर्थक आणि संभाव्य समर्थकांना एकत्रित ठेवणे, त्यांच्याशी संदेशांची देवाणघेवाण करणे आणि कारवायांमधील एकसुत्रता ठेवणे शक्य झाले.
- विशिष्ट गटामध्ये आणि एकदम लक्ष केंद्रीत अशा स्वरूपामध्ये या माहितीचा ओघ कायम ठेवणे, यावर 'इस्लामिक स्टेट'ने लक्ष केंद्रीत केले.
- 'इस्लामिक स्टेट'कडून धार्मिक वचनांचा अतिशय चपखलतेने वापर करण्यात आला. .त्याचाही त्यांना फायदा झाला

'इस्लामिक स्टेट'कडून सुरुवातीच्या टप्प्यामध्ये युरोपातील मुस्लिमांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. युरोपमध्ये मुस्लिमांचे काही दशकांमध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे. मात्र, तेथील विषमतेमुळे, या मुस्लिमांच्या मनामध्ये मोठा असंतोष आहे. स्थानिक बेरोजगारीच्या तुलनेमध्ये मुस्लिमांमधील बेरोजगारीचे प्रमाण तिप्पट किंवा त्यापेक्षा जास्त आहे. यातील बहुतांश जणांचे वय हे १५ ते २५ या वयोगटातीलच आहे. तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे थेट तरुणांनाच लक्ष्य करणे त्यांना सहज शक्य झाले आहे.

'इस्लामिक स्टेट'कडून सोशल मीडियाचा वापर केला जात असताना, सोशल मीडियाची व्याप्ती किती मोठी आहे, हे पाहिल्यानंतरच या धोक्याची जाणीव होऊ शकते. प्रचलित सोशल मीडियाचा विचार केला, तर 'यू-ट्युबने जाहीर केलेल्या २०१४च्या आकडेवारीनुसार, प्रत्येक महिन्याला एक अब्ज यूझर या वेबसाइटला भेट देत होते, सुमारे सहा अब्ज व्हिडिओ तास कालावधीचे व्हिडिओ दर महिन्याला पाहात होते. तर, प्रत्येक महिन्याला १०० तास व्हिडिओ या वेबसाइटवर अपलोड होत होते. तर, ट्विटरवर २०१४च्या आकडेवारीनुसार, प्रत्येक मिनिटाला ३.५ लाख ट्विट करत होते आणि एका दिवसाचा हा आकडा ५० कोटी होता. सर्वांत मोठ्या मानल्या जाणाऱ्या फेसबुक या सोशल मीडिया नेटवर्कवर ५० कोटी यूझर सक्रिय आहेत, तर ५.५ कोटी लोक आपली माहिती अपडेट करत असतात.'[xxii]या विस्तृत माहितीचा विचार केला, तर 'इस्लामिक स्टेट' किंवा

अशा संघटनांचा सोशल मीडियावर शोध घेणे किती कठीण आहे, याचा विचार करता येईल.

## भारतासह दक्षिण आशियातील परिस्थिती

'इस्लामिक स्टेट'ने १० जानेवारी २०१५ रोजी व्हिडिओ प्रसिद्ध करत, 'इस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया - खोरासन' गटाची स्थापना केली.[xxiii] पाकिस्तानातून दहशतवादी कारवाया करणाऱ्या तेहरिके तालिबान-पाकिस्तान संघटनेच्या काही म्होरक्यांनी एकत्र येत बगदादीचे नेतृत्व मान्य केले होते आणि या गटाची स्थापना केली होती. त्यावेळी हाफिज सईद खान याची अमीर म्हणून घोषणा करण्यात आली होती. या गटाने त्यानंतर अफगाणिस्तानसह पाकिस्तान आणि इराणच्या काही भागामध्ये कारवाया केल्या आहेत. एप्रिल २०१५मधील जलालाबाद (अफगाणिस्तान) येथील बॉम्बस्फोट, नोव्हेंबरमध्ये पाकिस्तानच्या क्वेट्टा शहरातील सुफी संताच्या धर्मस्थळाजवळ झालेला आत्मघाती बॉम्बस्फोट, नोव्हेंबर २०१८मध्ये पाकिस्तानच्याच ओरकझाई शहरातील बाजारामध्ये शिया मुस्लिमांना लक्ष्य करून केलेल्या हल्ल्यांचा यामध्ये उल्लेख करता येईल. या गटामध्ये तेहरिके तालिबान आणि लष्करे इस्लाम या संघटनांचे दहशतवादी सामील झाले आहेत. त्याचबरोबर बांगलादेश, श्रीलंका, मालदिव या देशांमध्येही इस्लामिक स्टेटच्या कारवाया दिसून आल्या आहेत.

‘इस्लामिक स्टेट’ने भारतावरही लक्ष केंद्रीत केल्याचे वेळोवेळी समोर आले आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील चार तरुण मे २०१४मध्ये इराकमार्गे सीरियामध्ये निघून गेले होते. त्यातील अरिब माजीद हा तरुण वर्षभरानंतर परतला, तर अन्य तिघे तेथेच राहिले. त्यातील दोघांचा अमेरिकेच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्राबरोबरच अन्य राज्यांमधील तरुणांनाही ‘इस्लामिक स्टेट’ने फितवले आहे आणि जवळपास ११२ तरुण ‘इस्लामिक स्टेट’मध्ये सहभागी होण्यासाठी निघून गेल्याचे ‘ऑब्जर्व्हर रिसर्च फाउंडेशन’ने केलेल्या संशोधनामध्ये समोर आले आहे.[xxiv] ही संख्या

यापेक्षाही जास्त असू शकते, अशी शक्यताही यात व्यक्त करण्यात आली आहे. यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ११२पैकी ३७ तरुण केरळमधील आहेत. यातील ९५ टक्के



तरुणांना ऑनलाइन पद्धतीने फितवण्यात आले होते, हेही समोर आले आहे. सोशल मीडिया आणि अन्य वेबसाइटवरूनच अनेक तरुणांनाही फितवण्यात आले होते आणि त्यांच्या मनामध्ये कडवटपणा भरण्यात आल्याचेही दिसून आले आहे. महाराष्ट्रामध्येच ही संख्या कितीतरी जास्त आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) जून २०१९पर्यंत १२८ तरुणांचे हृदयपरिवर्तन केले आहे. यामध्ये दहा टक्के तरुणी आहेत.

याशिवाय, भोपाळ-उज्जैन रेल्वेमध्ये एक कमी तीव्रतेचा बॉम्बस्फोट झाल्यानंतर, ७ मार्च २०१७ रोजी इस्लामिक स्टेटच्या उत्तरेतील जाळ्याविषयी विशेष चर्चा झाली. यामध्ये सैफुल्ला या तरुणाचे नाव समोर आले आणि दुसऱ्याच दिवशी लखनौमध्ये झालेल्या चकमकीत तो मारला गेला. ही कारवाई १२ तास चालली. या प्रकरणामध्ये अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांकडून शफी अरमारचे नाव समोर आले आणि त्यामुळे, एकसारखा विचार करणाऱ्या व्यक्तींना एकत्र बांधत कारवाई कशी घडवून आणता येते, हा धोका समोर आला. राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि विविध राज्यांमधील 'एटीएस'कडून कारवाई करत, 'इस्लामिक स्टेट'चे मोड्युल उद्ध्वस्त करण्यात आले आहे. त्यामध्ये शफी अरमारचेच नाव समोर आले आहे आणि त्यानेच सोशल मीडियाच्या माध्यमातून यात तरुणांना फितवल्याचेही स्पष्ट होते.

श्रीलंकेमध्ये एप्रिल २०१९मध्ये 'ईस्टर संडे' दिवशी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये 'इस्लामिक स्टेट'च्या तमिळनाडू-केरळमधील मोड्यूलचा सहभाग असल्याचे सांगितले जाते. श्रीलंकेतील तरुणांना हाताशी धरून, तेथील तीन चर्च आणि तीन आलिशान हॉटेलला लक्ष्य

https://www.pbs.org/newshour/world/explosions-in-sri-lanka-kill-more-than-130-on-easter-sunday (accessed on 14-02-2020)

करण्यात आले. या हल्ल्यामध्ये २५० जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे, ऑनलाइन पद्धतीने पसरलेल्या या जाळ्याचे आणखी एक उदाहरण समोर आले. या घटनेमध्ये श्रीलंकेतील झहरान हाशीम या धर्मगुरूचे नाव समोर आले. त्याने दक्षिण भारतातील अनेक तरुणांना फितवल्याचे 'एनआयए'च्या चौकशीमध्ये समोर आले.[xxv] या प्रकरणात केरळच्या पलक्कडमधील एका तरुणाला अटक करण्यात आली. तो सुरुवातीला झाकीर नाईकची भाषणे ऐकत होता, तर वर्षभरापासून झहरान हाशीमचे व्हिडिओ पाहात होता आणि प्रवचने ऐकत होता, अशी कबुली त्या तरुणाने दिली. त्याला केरळमध्येच हल्ला घडवून आणायचा होता, असेही या चौकशीत त्याने सांगितले. हा तरुण कधीही श्रीलंकेत गेला नव्हता आणि हाशीमला भेटलाही नव्हता. तरीही तो त्याच्या प्रभावाखाली आला होता आणि अन्य तरुणांनाही तो ही प्रवचने ऐकण्याचा आग्रह करत होता. या हल्ल्यामध्ये सहभाग असणारे अन्य काही तरुण आधीच अफगाणिस्तान आणि सीरियाला पळून गेले होते. या आधी जुलै २०१६मध्ये केरळच्या कासरगोड येथून १५ जणांचा एक गट बेपत्ता झाला होता. त्यातील १४ जण अफगाणिस्तानात गेले, तर एक जण सीरियामध्ये गेला.

ही गोष्ट श्रीलंकेतील स्फोट किंवा अशा काही घटनांपुरती मर्यादित नाही. तर, 'इस्लामिक स्टेट'कडून भारत आणि दक्षिण आशियावर लक्ष केंद्रीत केल्याचे आधीही दिसून आले आहे. अगदी सुरुवातीला 'इस्लामिक स्टेट'ने प्रसिद्ध केलेल्या 'विलायत-ए-खोरासन'च्यानकाशामध्ये भारताच्या काही भागाचाही समावेश होता. इराक आणि सीरियातील प्रदेश 'इस्लामिक स्टेट'ने गमावला असला, तरीही त्यातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त दहशतवादी तेथून निसटले आहेत. त्यातील अनेकांनी इराणमार्गे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतामध्ये आसरा घेतला असण्याची शक्यता एडमंड फिटन-ब्राऊन यांनी व्यक्त केली आहे.[xxvi]

'इस्लामिक स्टेट'ने अनेक वेळा भारतावर लक्ष केंद्रीत केल्याचे प्रयत्न दिसून येतात.[xxvii] यातूनच, या संघटनेने ३० एप्रिल २०१९ रोजी अबू मुहम्मद अल-बंगाली हा बंगालचा अमीर असल्याचे जाहीर केले होते. भारत आणि बांगलादेशमध्ये हल्ले घडवून आणण्याची सूचनाही त्याला केली होती. या वेळी इंग्रजी, बंगाली आणि हिंदी भाषांमधील

पत्रके प्रसिद्ध केली होती. त्यात म्हटले होते, की 'खलिफाचे बंगाल आणि हिंदमधील सैनिक शांत आहेत, असा तुमचा समज असेल, तर ही माणसे कधीच शांत असत नाहीत आणि बदला घेण्यासाठी कायम तयारीत असतात,' अशा आशयाचा मजकूर या पत्रकामध्ये होता. श्रीलंकेतील हल्ल्यानंतर काही दिवसांतच ही घोषणा करण्यात आली, ही गोष्ट विसरता येणार नाही. यानंतर काही दिवसांमध्येच, भारतामध्ये नवी 'विलायत' (प्रांत) स्थापन करत असल्याची घोषणा केली. ही 'विलायत' काश्मीरमध्ये होती आणि १० मे २०१९ रोजी सुरक्षा दलांबरोबर झालेली चकमक आपल्या संघटनेच्या दहशतवाद्यांबरोबरच झाल्याचा दावा'इस्लामिक स्टेट'च्या'अमाक न्यूज एजन्सी'ने केला होता.[xxviii]

भारताच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पश्चिम आशियातील देशांबरोबर भारताचे असणारे संबंध. 'ओव्हरसीज इंडियन मंत्रालया'च्या आकडेवारीनुसार, ५० लाख भारतीय परदेशामध्ये राहात आहेत. त्यातील ९० टक्के नागरिक आखाती देश आणि आग्नेय आशियामध्ये आहेत. २०१४मध्ये ८.०४ लाख भारतीय अन्य देशात गेले, त्यातील ३.२९ लाख जण सौदी अरेबियात, तर २.२४ लाख जण संयुक्त अरब अमिरातीमध्ये गेले. ७५ हजार कतार आणि ५१ हजार जण ओमानमध्ये गेले. या नागरिकांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, केरळ, तमिळनाडू, पंजाब, पश्चिम बंगाल, राजस्थान या राज्यांतील नागरिकांची संख्या सर्वाधिक आहे.या तरुणांवर तेथील स्थानिक परिस्थितीचा परिणाम होणे सहज शक्य आहे. यासाठी केरळमधील उदाहरण विचार करायला लावणार आहे. पश्चिम आशियातील देशांमध्ये गेलेल्या भारतीयांमध्ये सर्वाधिक नागरिक केरळमधील आहेत. त्यामुळे, केरळमध्ये तेथून येणाऱ्या पैशांबरोबरच तेथील मूल्येही आली आहेत. त्याचा परिणाम दिसत असल्यामुळेच, देशातील सर्वाधिक साक्षर असणाऱ्या राज्यात कडवेपणा आणि 'रॅडिकलायजेशन'चा सर्वांत जास्त धोका असल्याचे दिसून येते. केरळशिवाय, महाराष्ट्र, तेलंगण, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या राज्यांमध्येही हा धोका वाढत असल्याचे दिसून आले आहे. यातील ९५ टक्के तरुण ऑनलाइन पद्धतीने रॅडिकलाइज झाले आहेत. सोशल मीडियावर वेगवेगळ्या मजकुरांचा मारा करून तरुणांना फितवण्याचा प्रयत्न आहे. यामध्ये व्हिडिओ आणि वेगवेगळ्या

कथित धर्मगुरूंची भाषणे यांबरोबरच दाबिक, रुमैया यांसारख्या नियतकालिकांतूनही चिथावणीखोर मजकूर देण्यात येत असतो. त्यामुळेच, वेगवान आणि अतिशय शक्तिशाली ठरणाऱ्या सोशल मीडिया व त्यावरील चिथावणीखोर मजकुराचा सामना करण्याचे नवे आव्हान आपल्यासमोर उभे ठाकले आहे आणि त्याचा सामना करण्यासाठी नव्या विचारांनी धोरण तयार करणे अत्यावश्यक ठरणार आहे.

---

[i]The Islamic State A struggle within Islam - RajendraAbhyankar, ISIS - The Challenge and the Response, Ed. ShrikantParanjpe, YCNISDA, Kalinge Publication, New Delhi, Published in 2015

[ii]IsischaUdrakaaniTyacheMaharashtravarilParinam, MadhubanPingle, RambhauMhalagiPrabodhini Publication, 2017, P 13-20

[iii]Ibid, p-35

[iv]**Timeline: the Rise, Spread, and Fall of the Islamic State,** 28Oct 2019, Wilson Center, https://www.wilsoncenter.org/article/timeline-the-rise-spread-and-fall-the-islamic-state (accessed on 27-12-2019)

[v] Ibid

[vi]**Isis in Iraq: Militants 'getting stronger again'** 23 December 2019 ,BCC News, https://www.bbc.com/news/world-middle-east-50850325(accessed on 30-12-2019)

[vii]Global Threat Forecast, RohanGunaratna, Counter Terrorist Trends and Analyses, S. Rajaratnam School of International Studies, Vol 10. Issue 1, January 2018,P 2-3https://www.rsis.edu.sg/wp-content/uploads/2018/01/CTTA-Annual-Threat-2018.pdf (accessed on 01-12-2019),

[viii] The Islamic State Wilayats and Global Expansion, 13 Sept 2016, https://css.ethz.ch/en/services/digital-library/articles/article.html/be0e5f9f-0511-4844-85a8-ded3bd9219e2/pdf (accessed on 14-02-2020)

[ix]After The Caliphate, Colin Clarke, Polity Press, 2019,P 53

[x]Ibid, P-5

[xi]IbidP 70-71

[xii]Counter Terrorist Trends and Analyses, Vol 10. Issue 1, S. Rajaratnam School of International Studies January 2018, https://www.rsis.edu.sg/wp-content/uploads/2018/01/CTTA-Annual-Threat-2018.pdf (accessed on 01-12-2019)

[xiii]Where Do ISIS Fighters Go When the Caliphate Falls?, Colin P. Clarkeand Amarnath Amarasingam, March 6, 2017, https://www.theatlantic.com/international/archive/2017/03/isis-foreign-fighter-jihad-syria-iraq/518313/ (accessed on 05-12-2019)

[xiv]https://www.britannica.com/topic/Rashidun (accessed on 14-02-2020)

[xv]After The Caliphate ,Colin Clarke, Polity Press, 2019, P 50-51

[xvi]Prof. Peter Neumann - "Online Radicalisation: Myths and Reality"https://www.youtube.com/watch?v=JLV8D9mQs6U(accessed on 22-11-2019)

[xvii]Interview of Abdul QuaderMukadam

[xviii]Islam DnyataaniAdnyat, Abdul QuaderMukadam, AksharPrakashan, 2019, P 35-40

[xix]After The Caliphate, Colin Clarke, Polity Press, 2019, P-41

[xx]Counter Terrorist Trends and Analyses, Vol 10. Issue 1, S. Rajaratnam School of International Studies, January 2018 https://www.rsis.edu.sg/wp-content/uploads/2018/01/CTTA-Annual-Threat-2018.pdf (accessed on 01-12-2019)

[xxi]Ibid P-65-66

[xxii]Cyber-Extremism: Isis and the Power of Social Media ,Imran Awan ,Social Science and Public Policy ,15 March 2017https://www.researchgate.net/publication/315212548_Cyber-Extremism_Isis_and_the_Power_of_Social_Media (accessed on 12-11-2019)

[xxiii]The Islamic State of Iraq and the Levant - Khorasan (ISIL - K), https://www.un.org/securitycouncil/content/islamic-state-iraq-and-levant-khorasan-isil-k (accessed on 14-02-2020)

[xxiv]Uncovering the influence of ISIS in India ,Kabir Taneja ,ORF Paperhttps://www.orfonline.org/research/42378-uncovering-the-influence-of-isis-in-india/#_ednref12 (accessed on 15-09-2019)

[xxv]A suspect arrested by NIA from Kerala has admitted to be following Sri Lankan bomber ZahranHashim ,29 April 2019 ,https://economictimes.indiatimes.com/news/defence/a-suspect-arrested-by-nia-from-kerala-has-admitted-to-be-following-sri-lankan-bomber-zahran-hashim/articleshow/69101997.cms (accessed on 15-09-2019)

[xxvi]ISIS eyeing India in comeback plan,Adil Rashid, 06 May 2019 , https://idsa.in/idsacomments/isis-eyeing-india-in-comeback-plan-060519 (accessed on 15-09-2019)

[xxvii]Ibid

[xxviii]ISIS announces new 'branch' in India after clashes in Kashmir ,12 May 2019 , https://economictimes.indiatimes.com/news/defence/isis-announces-new-branch-in-india-after-clashes-in-kashmir/articleshow/69288536.cms (accessed on 15-09-2019)